# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ. १०९७/प्र.क्र.१३७/९७/पं.रा.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ८ ऑगस्ट १९९७.

## परिपत्रक

**विषय :** ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूका–१९९७
निवडणूकांमधील अडी-अडचणींबाबत.........

प्रत्यक्ष निवडणूका घेण्याच्या कामात आलेले अनुभव, अडचणी व १९९६-९७ मध्ये होणाऱ्या निवडणूकांची पूर्वतयारी हे जाणून घेण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतींच्या प्रत्यक्ष निवडणूका घेणारे अधिकारी यांचेसमवेत चर्चा व विचारांची देवाण-घेवाण होण्याच्या दृष्टीने आयोगातील अधिकाऱ्यांसमवेत काही ठिकाणी बैठका घेण्यात आल्या. त्यामध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील आयोगाचे मार्गदर्शन पुढीलप्रमाणे आहे :––

| मुद्दा क्र. (१) | मुद्दा (२) | मार्गदर्शन (३) |
|---|---|---|
| १ | राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ-ग्रापनि/१०९४/००७/९४, दिनांक ३ जानेवारी १९९७ प्रमाणे ग्रामपंचायतींच्या प्रभागाची व्याप्ती ही लोकसंख्येच्या आधारावर करावयाची आहे. ज्यासाठी घरयाद्या व जनगणनेच्या नकाशाचे सहकार्य घेण्याबाबत सूचित केलेले आहे. त्यानुसार प्रत्यक्षात प्रभाग रचना केल्यास घरयादीतील कुटुंब प्रमुखाचे नाव व त्याचा गट क्रमांक पाहता प्रभागाची व्याप्ती केल्यास त्या प्रभागास जी घर आहेत ती इतर दूरच्या प्रभागास जोडली जातात. त्याचप्रमाणे तयार केलेल्या व्याप्तीचे निरीक्षण करता प्रभाग रचना ही दक्षिण-पश्चिम, पश्चिम-उत्तर, उत्तर-पूर्व, पूर्व-दक्षिण याप्रमाणे तयार होत नाही. त्यामुळे याबाबत ग्रामस्थाकडून मोठ्या प्रमाणात शिकायती आयोगाकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच त्यांचे घराचे मूळ क्रमांक व जनगणनेचे घर क्रमांक यांत तफावत असल्याकारणाने, प्रत्येक कुटुंब प्रमुख वा व्याप्तीबाबत गोंधळून जाईल. राज्य निवडणूक आयोगाने २२ जानेवारी १९९६ अन्वये ज्या २५ प्रश्नांबाबत जे मार्गदर्शन केले आहे, त्यामधील मुद्दा क्र. १ मध्ये प्रभाग रचना ही कुटुंब प्रमुखाच्या नांवाने सुरू करून शेवटच्या कुटुंब प्रमुखाचे नांव दर्शवून अथवा प्रचलित घर यादीप्रमाणे करण्याबाबत मार्गदर्शन केले आहे. | राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ-१०९६/प्र.क्र. ८/९६/पंरा. दिनांक १२ फेब्रुवारी १९९६ च्या पत्रातील परिच्छेद क्र. २ मधील मुद्दा क्र. १ मध्ये दिलेल्या सूचनेनुसारच प्रभाग रचना करावयाची आहे. मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या, प्रभाग रचना व जागांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील तरतूदीनुसार जागांचे आरक्षणाबाबत नियम ५ उपनियम (२) मधील खंड (ब) मधील तरतूदीनुसार देण्यात आलेले अनुसूचीनुसार प्रभाग रचनेची व्याप्ती दर्शविण्याबाबतचा उल्लेख या मुद्द्याच्या मार्गदर्शनात केलेला आहे. अनुसूचीमधील रकाना-१ हे प्रभागाची संख्या व विस्तार असा उल्लेख आहे. त्यामध्ये प्रभाग रचनेची व्याप्ती दर्शवित असताना दक्षिणेकडे असलेल्या घरांच्या प्रचलित याद्या किंवा घरमालकाचे नांव याने सुरुवात करून शेवट करण्याबाबतचे मार्गदर्शन देण्यात आलेले आहे. नियमातील प्रभागांची संख्या व विस्तार हा शब्द मोघम स्वरुपाचा आहे. यामध्ये विस्तार हा जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कोणत्या प्रकारे वर्णन करावे, हे निश्चित करू शकतात. यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या सविस्तर मार्गदर्शनाची आवश्यकता नाही. भारताच्या संविधानामधील तरतूद आणि त्या अनुषंगाने झालेला मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या, प्रभाग रचना व जागांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील तरतूदीनुसार राज्य निवडणूक आयोगाने मार्गदर्शन दिलेले आहे. त्या |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | मार्गदर्शनानुसार व कायद्यानुसार प्रभाग रचना करीत असताना ग्रामस्थांकडून आयोगाकडे आलेल्या तक्रारींबाबत प्राधिकृत अधिकाऱ्याने संविधानातील व कायद्यातील तरतूदी विचारात घेऊन त्यावर निर्णय घ्यावयाचा आहे. प्रचलित स्थानिक वर्णनानुसार आहे. प्रचलित स्थानिक वर्णनानुसार किंवा क्रमांकानुसार कुटुंब प्रमुख व व्याप्तीबाबत गोंधळून जाण्याचे कारण नाही याबाबत नागरिकांनी सूचना व हरकत प्राथमिक प्रभाग रचना प्रसिद्ध झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांचेकडे देण्याबाबत तरतूद असून, त्यास संधी देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग रचना अंतिम करून राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम विहित केलेल्या दिनांकास प्रसिद्ध करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची आहे. |
| २ | एकाच प्रभागात एकाच नांवाच्या काही व्यक्ती राहतात, त्याचप्रमाणे ज्या घरापासून सुरुवात करतो त्याच्या थोड्याच अंतरावर निरनिराळ्या दिशेकडे जाणारे बोळ अथवा रस्ते येतात अशावेळी या प्रकारे प्रभाग रचना करणे कठीणच नव्हे तर मतदारांच्या इच्छेविरूद्ध होईल, त्यामुळे याप्रमाणे प्रभाग रचना करणे हे योग्य वाटत नाही. | प्रथम प्रभाग रचना करावयाची असून, त्या प्रभाग रचनेचे वर्णन किंवा व्याप्ती किंवा विस्तार करण्याबाबतचे मार्गदर्शन उपरोक्त मुद्दा क्र. १ मध्ये देण्यात आलेले आहे. वर नमूद केलेल्या मुद्यानुसार प्रभागाच्या विस्तारांचे वर्णन करीत असताना त्या प्रभागातील सीमारेषांबद्दल जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार वर्णन करावयाचे आहे. सर्वच मतदारांच्या इच्छेनुसार प्रभाग रचना करता येणे अशक्य आहे. प्रभाग रचनेबाबत हरकती व सूचना मागविण्यात येणार आहेत. त्या हरकती व सूचनांचा विचार करूनच प्रभाग रचना कायद्यातील तरतूदी विचारात घेऊनच अंतिम करावयाची आहे. |
| ३ | यामध्ये अस्तित्वात असलेली घरयादी जरी नमूद केले असले तरी नेमकी घरयादी कोणती वापरावयाची याबाबत कोठेही स्पष्ट सूचना नाहीत. उदा. ग्रामपंचायतीची घरयादी, जनगणनेचे क्रमांक असलेली घरयादी जर ग्रामपंचायतीच्या क्रमांकाची घरयादीतील घर क्रमांकानुसार प्रभागारी व्याप्ती केली तर याबाबत मतदाराचे आक्षेप शून्य येतील परंतु, याची पडताळणी कुटुंब प्रमुखाच्या घर यादीशी तुलना केल्यास दोन्हीमध्ये अतोनात फरक आहे. त्यामुळे दोन्हीच्या ताळमेळीने प्रभाग रचना करता येणार नाही जर ग्रामपंचायतींच्या घरयादीप्रमाणे प्रभागाच्या व्याप्तीमध्ये घर क्रमांक दर्शविले तर हेच घर क्रमांक व त्या प्रभागात वास्तव्य करणारे मतदार यांचे परीक्षण केले असता ग्रामपंचायतीचे घर नंबर व त्यांत वास्तव्य करणाऱ्या व्क्ती व विधानसभेच्या मतदार यादीतील मतदार यांची नांवे एकसंघ जुळतात. | विस्ताराचे वर्णन करीत असताना प्रचलित घरयाद्या वापरण्याबाबतचा उल्लेख वर नमूद केलेल्या मुद्दा क्र. १ मध्ये आहे. त्यांत प्रचलित घरयादी वापरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार प्रभागाची व्याप्ती, विस्ताराचे वर्णन करणे शक्य नसेल तेथे जिल्हाधिकारी यांचे आदेश अंतिम असतील. संविधानातील व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतूदीनुसार लगतच्या जनगणनेच्यावेळी दाखविलेल्या लोकसंख्येनुसार प्रभाग रचना करणे आवश्यक आहे. **कोणत्याही परिस्थितीमध्ये विधानसभेच्या मतदार यादीनुसार ग्रामपंचारतींची प्रभाग रचना करावयाची नाही. प्रभागाच्या मतदारांमध्ये तफावत असली तरीही ग्रामपंचायतीची प्रभाग रचना ही लोकसंख्येवरच आधारित असली पाहिजे.** |
| ४. | राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ.१०९७/प्र.क्र. ११६/९७/पंरा, दिनांक २ जुलै १९९७ अन्वये जनगणनेची | राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र. रानिआ.१०९७/प्र.क्र. ११६/९७/पंरा, दिनांक २ जुलै १९९७ अन्वये जनगणना गट |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | शक्यतो गट न फोडता प्रत्येक प्रभागात १० टक्के कमी अथवा जास्त लोकसंख्या येत असेल तर गट फोडू नये पण जर गट फोडणे आवश्यक असेल तर जिल्हाधिकारी यांची परवानगी घ्यावी असे नमूद केले आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीचे कमीत-कमी तीन व जास्ती-जास्त सहा प्रभाग पडतात याबाबत गटाचा विचार करता कमी कमी दोन व जास्तीत जास्त वीस गट जनगणनेने पडलेले आहेत. त्यामुळे सदस्यांच्या संख्येप्रमाणे लोकसंख्येचे प्रमाण निश्चित करताना प्रत्येक जनगणनेचा गट फोडणे क्रमप्राप्त आहे. जर गट फोडले नाहीत तर प्रभागातील सदस्यांच्या संख्येशी लोकसंख्येचे प्रमाण हे २०० ते ३०० पेक्षा जास्त होणार आहे व यातील मतदारांच्या संख्येचे व निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या संख्येचे प्रमाण पाहता बरीच तफावत निदर्शनास येईल. | शक्यतो वर न तोडता प्रभाग रचना करण्यात यावी. **तथापि, एखाद्या ठिकाणी जनगणनेचा गट फोडणे आवश्यक असेल त्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांची विशेष मान्यता घ्यावी. मतदाराच्या संख्येचा विचार प्रभाग रचना करीत असताना करण्याची आवश्यकता नाही.** ग्रामपंचायतीतील प्रभाग विभाजन हे सन १९९१ च्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या तत्त्वानुसारच करावयाचे आहे. जनगणनेचा प्रगणक गट न फोडता १० टक्के जास्त व १० टक्के कमी या मर्यादेपर्यंत प्रभाग रचना करावयाची आहे. जेथे प्रगणक गटाची लोकसंख्या जास्त असेल तेथे जिल्हाधिकारी यानी विशेष बाब म्हणून मान्यता द्यावयाची आहे. विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या प्रगणक गटाच्या लोकसंख्येच्या मर्यादेचा विचार करण्याची आवश्यकता नाही. प्रभाग रचना करताना मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या, प्रभाग रचना व जागांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील तरतूदीनुसारच करावयाची आहे. प्रभाग रचनेचा विस्तार दर्शवित असताना प्रचलित घर याद्यांचे वर्णन करणे जेथे शक्य नाही तेथे जनगणनेच्या प्रगणक गटाच्या वर्णनानुसार वर्णन करण्यात यावे. **कोणत्याही परिस्थितीत मतदार यादीनुसार ग्रामपंचायतीच्या प्रभागाचे विभाजन करावयाचे नाही. प्रभाग रचनेबाबत हरकती व सूचना मागविण्यात येतात त्यावेळी ग्रामस्थांनी आपल्या हरकती व सूचना जिल्हाधिकाऱ्यांकडे द्यावयाच्या आहेत.** |
| ५. | ग्रामपंचायतींची प्रभाग रचना केल्यानंतर प्रभागनिहाय करावयाच्या मतदार याद्यामध्ये विधानसभेच्या पुरवणी यादीतील मतदार हे त्या प्रभागांमध्ये समाविष्ट न होण्याची शक्यता आहे. कारण पुरवणी याद्या या वेगळ्या असतात. | प्राथमिक प्रभाग रचना प्रसिद्ध झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकाला अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादी पुरवणी यादीसह किंवा त्या दिनांकापावेतो त्यांत काही बदल केलेले असल्यास ते बदल विचारात घेऊन प्रभागवार फोडावयाची आहे. विधानसभेच्या पुरवणी यादीत नमूद केलेल्या घरातील लोकांची नांवे मतदार यादीत संबंधित घर ज्या प्रभागामध्ये पडत असेल त्या प्रभागात घेण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे. |
| ६. | निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्रे स्वीकारणे/ अस्विकारणे या निर्णयाविरूद्ध उमेदवार न्यायालयामध्ये गेल्यास व त्यासाठी स्थगनादेश दिल्यावर काय करावे ? | मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मध्ये नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वैध उमेदवारांची यादी ग्रामपंचायत कार्यालय व चावडीवर किंवा सार्वजनिक ठिकाणी लावण्याबाबतची तरतूद आहे. यामध्ये नामनिर्देशनपत्र स्वीकारणे/अस्विकारणे याबाबत कोणत्याही न्यायालयामध्ये जाण्याची तरतूद नाही. न्यायालयात कोणी गेला तर संबंधित प्रकरणात न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसारच कार्यवाही करणे आवश्यक राहील. |

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| ७. | प्रभाग रचनेचे प्रस्ताव तयार करताना अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये २७ टक्के जागा इतर मागास प्रवर्गासाठी ठेवाव्यांत किंवा कसे ? | मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, १९९७ हा अधिनियम क्र. ४०, दिनांक ७ ऑगस्ट १९९७ रोजी अंमलात आला आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे आरक्षण हे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १० मधील पोटकलम (२) च्या खंड (ब) नुसार अनुसूचित जाती/ जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार जागांचे आरक्षण राहील. अनुसूचित जमातीची लोकसंख्या विचारात घेता सर्व जागा अथवा बहुसंख्य जागा अनुसूचित जमातीसाठी देय असतील तर अशा सर्वच्या सर्व अथवा बहुसंख्य जागा अनुसूचित जमातीस दिल्या जातील. परंतु अशा तऱ्हेने सर्व जागा अथवा बहुसंख्य जागा अनुसूचित जमातीस देय होत नसल्या तरी अनुसूचित जमातीस पंचायतीमधील जागांच्या एकूण संख्येच्या एक द्वितीयांशपेक्षा कमी जागा देय असणार नाही, अशी तरतूद आहे. कलम १० मधील पोटकलम (२) चा खंड क नुसार संपूर्णतः अनुसूचित क्षेत्र समाविष्ट असलेल्या पंचायतीमध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा अनुसूचित जमातीसाठी व अनुसूचित जातीसाठी काही जागा देय असल्यास त्या राखून ठेवण्यात आल्यानंतर, राहिलेल्या जागांच्या २७ टक्के इतक्या असतील. |
| ८. | प्रभागरचनेचा प्रस्ताव तयार करताना ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या जास्त असून, त्यांचा समावेश अनुसूचित क्षेत्रामध्ये नाही. त्या ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य लोकसंख्येनुसार अनुसूचित जमातीचे म्हणून आरक्षित होतात. यांत मागासवर्गीय प्रवर्गासाठी २७ टक्के आरक्षण तसेच बिनराखीव जागा ठेवाव्यात किंवा कसे ? | अनुसूचित क्षेत्रात अधिसूचित न झालेल्या ग्रामपंचायतींची प्रभाग रचना करताना भारताचे संविधानातील अनुच्छेद क्रमांक २४३डी मधील उपकलम (१) नुसार आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १० चे उपकलम (२) मधील खंड (ब) नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव पदे ठेवावयाची आहेत. लोकसंख्येनुसार अनुसूचित जमातीचे आरक्षण सर्व जागांसाठी होत असल्यास त्यांत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी २७ टक्के आरक्षण देय नाही. तसेच तेथें बिनराखीव जागाही देय नाहीत. |
| ९. | ग्रामपंचायत निवडणूकीचा निवडणूक कार्यक्रम सन १९९५-९६ प्रमाणे दोन टप्प्यांत आयोगाकडून देण्यात येईल किंवा कसे ? | ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची संख्या लक्षात घेता निवडणूकांचा कार्यक्रम एकाच टप्प्यात घेण्यात येईल. |
| १०. | बोटाला लावण्याची शाई, पेपर सील जिल्हा स्तरावरून खरेदी करून/ छपाई करून तहसिलदार यांना पुरवावे किंवा कसे ? | बोटाला लावण्याची शाई, पेपर सील हे नियमानुसार स्थानिक स्तरावरून खरेदी करावयाचे आहे. |
| ११. | निवडणूक काळातील आचारसंहिता व तिचे पालन याबाबत आयोगाचे मार्गदर्शन घ्यावे. | निवडणूक काळातील आचारसंहितेबाबत राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या पत्र क्र. रानिआ-१०९७/प्र.क्र. ३६/९७/पंरा, दिनांक ३ फेब्रुवारी १९९७ नुसार पालन करावयाचे आहे. |

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| १२. | उमेदवारांच्या निवडणूक खर्चाबाबत मार्गदर्शन घ्यावे. | उमेदवारांच्या निवडणूक खर्चाबाबत उमेदवाराने ३० दिवसांच्या आंत त्यांचा निवडणूक खर्च सादर करावयाचा आहे. या बाबत कसूर झाल्यास भारतीय दंडसंहिता १९८० मधील कलम " १७१ आय् " नुसार कार्यवाही करावयाची आहे. |
| १३. | ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी लोकसभा/विधानसभेच्या मतपेट्या वापराव्यात किंवा कडी कुलुपांच्या महाराष्ट्र टाईप जम्बो मतपेट्या वापराव्यात किंवा कसे ? | ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने दिलेला असून, आपल्या आवश्यकतेनुसार मतपेट्या व मतदान साहित्याबाबत आपली मागणी विहित पद्धतीने केंद्र निवडणूक आयोगाकडे नोंदवावी व त्याच पेट्या निवडणूकीसाठी वापराव्यात. |
| १४. | ग्रामपंचायतींचे प्रभाग रचनेचे प्रस्ताव तयार करताना एन्आयसी, नासिक सेंटर यांचेकडून गांववार सन १९९१ च्या जनगणनेच्या याद्या वापराव्यात किंवा कसे ? | ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेसाठी जनगणना विषयी अधिकृत माहिती जनगणना कार्यालयाकडून घेण्यात यावी. |
| १५. | निवडणूक कामी आवश्यक असणारे विविध प्रकारचे फॉर्मस्, मतदान साहित्य इत्यादी सर्व महाव्यवस्थापक शासकीय मुद्रणालय, मुंबई यांचेकडून पुरविले जाईल किंवा कसे ? तसेच मतपत्रिका छपाईचा कागद त्यांचेकडून पुरविला जाईल किंवा कसे ? | निवडणूकीच्या कामी आवश्यक असणारे विविध प्रपत्रे/मतदान साहित्य इत्यादिंबाबत छपाई शासकीय मुद्रणालयातून अथवा व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय यांच्याकडून ना हरकत पत्र मिळविल्यानंतर स्थानिकरित्या उपलब्ध करावयाचे आहेत. |
| १६. | प्रभाग रचनेचे वॉर्डनिहाय लॉट पद्धतीने सदस्यांचे आरक्षण कशा प्रकारे करावे ? याबाबत लॉट पद्धतीबाबत मार्गदर्शन व्हावे. | अनुसूचित जाती/जमातीचे राखीव पद लोकसंख्येच्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाने द्यावयाचे असून, स्त्री राखीव व नागरिकांचा इतर मागासवर्गीय प्रवर्ग यांचे चिठ्ठ्या टाकून आरक्षण निश्चित करावयाचे आहे. याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक एसईसी-१०९५/१०१/पीआर्, दिनांक १८ जानेवारी १९९५ च्या पत्रासोबत दिलेल्या सभेच्या इतिवृत्तानुसार चिठ्ठ्या काढाव्यात. |
| १७. | ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी दिनांक १ ऑगस्ट १९९७ रोजीच्या मतदार याद्या केल्या जातील त्याच याद्या पोटनिवडणुकीसाठी वापराव्यात किंवा कसे ? | ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या दिनांक १ ऑगस्ट१९९७ रोजीच्या मतदार याद्या या निवडणूक कार्यक्रमांतर्गत पोटनिवडणुकीसाठी वापराव्यात. |
| १८. | प्रभाग रचना तयार करणेवरील अडचणी प्रभाग रचना नियमानुसार अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्ग व स्त्रिया यासाठी पदे प्रभागातून ठेवताना व्यवहार्य असेल तेथवर प्रत्येक प्रभागात किमान एक पद बिनराखीव ठेवण्याचे आहे. तथापि, काही गावांतील भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीमुळे अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती असलेले क्षेत्र विभागणे शक्य नसते, अशा परिस्थितीत बिनराखीव पद ठेवणे शक्य होत नाही. | मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या, प्रभाग रचना व जागांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील तरतूदीनुसार प्रभाग रचना करावयाची असून. प्रथम देय पदे निश्चित करावयाची आहेत. देय पदे नियम २ अ नुसार निश्चित करावयाचे आहे. अशी देय पदे निश्चित केल्यानंतर भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती लक्षात घेऊन प्रभाग रचना ग्रामपंचायतींच्या दक्षिणेपासून सुरू करून दक्षिण-पश्चिम, पश्चिम, उत्तर-पश्चिम, उत्तर, उत्तर-पूर्व, पूर्व व दक्षिण-पूर्व अशा प्रकारे प्रभाग रचना करावयाची आहे. असे करीत असताना **अनुसूचित जाती अनुसूचित जमाती यांचे क्षेत्र एकत्रित** |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | **<u>राहिलच असे नाही.</u>** अशी प्रभाग रचना केल्यानंतर नियम-४ मधील उपनियम (२) नुसार अनुसूचित जाती व जमातींच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार अनुसूचित जाती व जमातीच्या पदांचे वेगवेगळ्या प्रभागामध्ये वाटप करावयाचे आहे. तथापि, गांवातील भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीमुळे अनुसूचित जाती/जमातीचे असलेले क्षेत्र विभागणे अशक्य आहे.<br>हा मुद्दा ग्राह्य धरता येत नाही. **<u>काल्पिनिक स्वरुपाच्या मुद्द्याच्या आधारे अशा प्रकारची प्रभाग रचना माडण्यात येऊ नये.</u>** |
| १९. | मतदार यादी–मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचेकडील पत्र क्र. रानिआ-१०९७/प्र. क्र. १२३/९७/पंरा, दिनांक १९ जुलै, १९९७ नुसार ग्रामपंचायत निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करणेत येणार आहे. दिनांक १ ऑगस्ट १९९७ रोजी विधानसभेच्या अस्तित्वात असलेल्या यादीवरून ग्रामपंचायत निवडणूकीसाठी भागवार मतदार यादी तयार करणेची आहे. सध्याची विधानसभेची मतदार यादी दिनांक १ जानेवारी १९९६ हा अर्हता दिनांक धरून तयार करण्यात आली आहे. दिनांक १ जानेवारी १९९७ हा अर्हता दिनांक धरून मतदार यादीचे पुनर्विलोकन करण्याचे आदेश अद्याप प्राप्त झालेले नाहीत. सबब, दि. १ जानेवारी १९९६ रोजी ज्या व्यक्तीचे वय १८ वर्षे पूर्ण झालेले आहे त्यांचे नांव सदर मतदार यादीत समाविष्ट असणार आहे. मात्र, दि. १ जानेवारी १९९६ नंतर ज्या व्यक्तीचे वय १८ वर्षे पूर्ण झाले आहे त्यांची नांवे विधानसभा मतदार यादीत समाविष्ट करता येणार नसल्यामुळे ती ग्रामपंचायत मतदार यादीत समाविष्ट होऊ शकणार नाहीत. त्यामुळे स्थानिक पातळीवर लोकांच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात यैण्याची शक्यता आहे. | मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १२ नुसार राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकारोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या यादीनुसार (पुरवणी यादीसह किंवा त्या दिनांकापावेतो त्यांत काही बदल केलेले असल्यास ते बदल विचारात घेऊन) ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची मतदार यादी तयार (Maintain) करावयाची आहे. राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकाला विधानसभेच्या यादीत असलेल्या मतदारांचीच नांवे ग्रामपंचायतींच्या निवडणूकीच्या मतदार यादीमध्ये असतील. लोकांच्या तक्रारी येतील म्हणून संविधानातील व कायद्यातील तरतूदींकडे दुर्लक्ष करून बेकायदेशीररित्या कोणतीही कार्यवाही करण्याचे टाळावे. |

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

(अपर्णा जोशी)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग.

प्रति :

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त.